**ठळक बातम्या**

- गव्हाची साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी गव्हाच्या साठ्याची माहिती दर आठवड्याला वेबसाइटवर देण्याचे केंद्र सरकारचे सर्व व्यापाऱ्यांना आदेश

- कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करण्याची सुविधा देण्याआधी योग्य प्रशिक्षण देणं आवश्यक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- जम्मू- काश्मिरमध्ये रामबन जिल्ह्यात रस्ते अपघातात दहा जणांचा मृत्यू, प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून मृताच्या कुटुंबांना प्रत्येकी दोन लाख, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर

**आणि**

- माद्रीद स्पेन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या एन सिक्की रेड्डी आणि बी सुमित रेड्डी या जोडीचा मिश्र दुहेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश

**<><><><><><>**

गव्हाची साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी सरकारनं सर्व छोट्या मोठ्या व्यापाऱ्यांना गव्हाचा साठा जाहीर करण्याचे आदेश दिले आहेत. किरकोळ आणि घाऊक विक्रेते, मॉल, रिटेल चेन आणि प्रक्रिया करणाऱ्यांना हे साठे १ एप्रिलपासून evegoils.nic.in/wheat या वेबसाइटवर नमूद करावे लागेल. त्यानंतर पुढील आदेशापर्यंत दर शुक्रवारी साठ्यांची माहिती अपडेट करावी लागणार आहे. नोंदणी न केलेल्यांना या वेबसाइटवर नोंदणी करुन साठ्याची माहिती द्यावी लागेल. सध्या तांदळाच्या साठ्याची नोंदणी करणे बंधनकारक आहे.

**<><><><><><>**

AI-अर्थात कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करण्याची सुविधा देण्याआधी योग्य प्रशिक्षण देणं अत्यंत महत्त्वाचं आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मायक्रोसॉप्ट चे संस्थापक बिल गेटस यांच्याशी झालेल्या संवादात, त्यांनी सांगितलं की, योग्य प्रशिक्षण नसेल, तर या तंत्रज्ञानाचा गैरवापर होऊ शकतो, भारतासारख्या लोकशाही असलेल्या देशात कुणीही डीपफेकचा वापर करु शकतो, त्यामुळे डीपफेक निर्मिती आणि अस्सल मजुकर यातला फरक निश्चित करण्यासाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्व तयार करण्याचा आवाहन प्रधानमंत्र्यांनी यावेळी केलं. भारताच्या तंत्रज्ञान क्षेत्रातल्या प्रगतीची बिल गेटस यांनी प्रशंसा केली.

डाटा अर्थात माहितीची सुरक्षा ही मोठी चिंतेची बाब आहे. त्यामुळे भारताच्या खासगीपणाचा आदर राखत कोणत्याही कारणासाठी डाटाच्या वापराकरता अनुमती आवश्यक असली पाहिजे, असं मोदी म्हणाले. देशभरात विविध क्षेत्रांमध्ये डिजीटल सार्वजनिक पायाभूत सुविधांची नितांत आवश्यकता असून गावागावांमध्ये डिजीटल सुविधा पोहचवण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

निवडणूक आयोगाच्या सी व्हिजिल या ॲप ला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद लाभत असून आचारसंहितेच्या कथित उल्लंघनाच्या सुमारे ७९ हजार प्रकरणांची नोंद त्यावर झाली आहे. यापैकी एकूण ९९ टक्के तक्रारी निकाली काढण्यात आल्या असून ८९ टक्के तक्रारी तर अवघ्या १०० मिनिटात निकाली निघाल्या. बेकायदेशीरपणे होर्डिंग आणि बॅनरबाजी केल्याच्या सुमारे ५८ हजार ५०० तक्रारी नोंदल्या गेल्या तर सुमारे १४ शे तक्रारींमध्ये पैसे, भेटवस्तू आणि मद्यवाटप केल्याबद्दल आक्षेप आहे.

**<><><><><><>**

बिहारमध्ये महाआघाडीनं ४० लोकसभा जागांसाठीचे आपले उमेदवार घोषित केले. यात काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल, तसंच डाव्या पक्षांचे उमेदवार आहेत. लालू प्रसाद यादव याच्या नेतृत्वाखालचा राष्ट्रीय जनता दल २६ जागा लढवणार आहे, तर काँगेसचे उमेदवार ९ जागांवर आपलं नशीब आजमावतील. ५ जागा डाव्या पक्षासाठी सोडल्या आहेत. पाटणा इथे या पक्षांनी संयुक्त बैठकीद्वारे बातमीदारांना ही माहिती दिली.

<><><><><>

असदुद्दीन ओवेसी यांचा AIMIM पक्ष बिहारमधून लोकसभेच्या १६ जागा लढवणार आहे.

पाटलीपुत्र,समस्तीपूर,सीतामरही,वाल्मिकी नगर, मधुबनी इथे पक्षाचे उमेदवार लढतील असं प्रदेशाध्यक्ष अख्तरुल इमान यांनी सांगितलं. या अगोदर AIMIM नं बिहारमधल्या ११ लोकसभा जागांसाठीचे उमेदवार घोषित केले आहेत.

<><><><><>

पश्चिम बंगालमधल्या भगवानगोला आणि बरानगर या विधानसभा मतदारसंघांमधल्या पोटनिवडणुकीसाठी तृणमूल काँग्रेसनं आज उमेदवारांची नावं जाहीर केली. भगवानगोलामधून रेय़ात हुसैन सरकार, तर बरानगरमधून सयंतिक बॅनर्जी निवडणूक लढवतील. भगवानगोलामधे ७ मे, तर बरानगरमधे १ जूनला मतदान होणार आहे.

<><><><><>

‘ऑल इंडिया जमियतूल कुरैश’ या कुरैश समाजातील सामाजिक संघटनेनं नागपूर लोकसभा मतदारसंघातले महायुतीचे उमेदवार नितीन गडकरी यांना पाठिंबा दिला आहे. नागपुरातल्या तेलगू भाषिक महासंघानंही गडकरी यांना पाठिंबा जाहीर केला आहे.

**<><><><><><>**

अमरावती लोकसभा मतदारसंघात आज प्रहार पक्षानं माजी नगरसेवक दिनेश बूब यांची उमेदवारी जाहीर केली. भाजपाकडून विद्यमान अपक्ष खासदार नवनीत राणा आणि काँग्रेसकडून आमदार बळवंत वानखडे यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. वंचित बहुजन आघाडीनं प्राजक्ता पिल्लेवान यांना रिंगणात उतरवलं आहे. यामुळं महत्त्वाच्या चारही पक्षाचे उमेदवार रिंगणात उतरले आहेत.

**<><><><><><>**

श्रोते हो, लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी राज्यात सुरू झाली आहे. काही जागांवर उमेदवार जाहीर झाले आहेत काही ठिकाणी होणार आहे. महायुती आणि महाविकास आघाडीच्या जागावाटपाचं चित्र अजूनही स्पष्ट झालेलं नाही. अर्ज कधी भरायचे, मतदान कधी करायचं, निकाल कधी होणार हे मात्र स्पष्ट आहे. त्यामुळं राज्यातल्या लोकसभा मतदार संघातली परिस्थिती कशी आहे, कुठून कोण निवडणूक रिंगणात उतरलंय, निवडणूक लढवण्याविषयी उमेदवारांची भूमिका काय, राजकीय विश्लेषकांचं काय मत आहे, स्थानिकांच्या अपेक्षा काय याचं विश्लेषण करणारा कार्यक्रम ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ आकाशवाणी आपल्यासाठी घेऊन येत आहे सोमवार १ एप्रिलपासून. संध्याकाळी सव्वा ७ ते साडे ७ वाजेदरम्यान आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल. आकाशवाणी मराठी बातम्या हे पॉडकास्ट चॅनेलसह आकाशवाणीच्या विविध प्रादेशिक वृत्तविभागांच्या सोशल मीडिया आणि युट्युबवरही हा कार्यक्रम ऐकता येईल. तेव्हा ऐकायला विसरू नका, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’.
सोमवार १ एप्रिलपासून. संध्याकाळी सव्वा ७ ते साडे ७ वाजेदरम्यान

**<><><><><><>**

जम्मू- काश्मिरमध्ये रामबन जिल्ह्यात आज झालेल्या रस्ते अपघातात किमान दहा जणांचा मृत्यू झाला. जम्मूहून श्रीनगरकडे जाणारे प्रवासी वाहन मध्यरात्री जम्मू- श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावर बॅटरी चष्माजवळ खोल दरीत कोसळलं. पोलीस, राज्य आपत्ती प्रतिसाद दल आणि रामबन इथलं नागरी जलद प्रतिसाद दल बचाव कार्यासाठी तातडीनं घटनास्थळी पोहोचले. मात्र अंधार आणि खडतर भूप्रदेशामुळे बचावकार्य तातडीनं सुरू होऊ शकलं नाही.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. त्यांनी प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून मृताच्या कुटुंबांना प्रत्येकी दोन लाख रुपयांची आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<><><><><><>**

माद्रीद स्पेन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या एन सिक्की रेड्डी आणि बी सुमित रेड्डी या जोडीनं मिश्र दुहेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्यपूर्व फेरीत त्यांनी इंडोनेशियाच्या रिहान नौफाल कुशर्जंतो आणि लिसा आयु कुसमावती या जोडीवर २१-१४, ११-२१, १७-२१ असा विजय मिळवला.

महिला दुहेरीत भारताच्या तनिषा क्रॅस्टो आणि आश्विनी पोन्नप्पा या जोडीला उपांत्या पूर्व फेरीत परभव पत्करावा लागला. तैवानच्या लि शिया सिन आणि तेंग-चुन -सुन या जोडीनं त्यांना १३-२१, १९-२१ असं पराभूत केलं.

**<><><><><><>**

इंडियन प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आज बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात सामना सुरु आहे. कोलकाता नाईट रायडर्सनं नाणेफेक जिंकून, प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या ९ षटकात २ बाद ८२धावा झाल्या होत्या.

**<><><><><><>**

आज प्रभू येशू ख्रिस्तांच्या बलिदानाचा दिवस म्हणजेच गुड फ्रायडे आहे. इस्टर संडेच्या आधी येणारा शुक्रवार गुड फ्रायडे असतो. यानिमित्त देशभरात विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

धुळ्यामध्ये गुड फ्रायडे निमित्त चर्चंमध्ये विविध धार्मिक कार्यक्रम आणि प्रार्थना सभांचं आयोजन करण्यात आलं. तसंच चर्च परिसरातून काढण्यात आलेल्या शोभायात्रेत ख्रिस्ती बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले.

**//<><><><><><>//**